| ,, | ,, | २२ | सी. एस्. झेड. एम्. गर्ल्स स्कूल गंज पेठ .... | ... | ९९ | ९९ | ८८·८ | ६३·४ | ... | ५ | ५ | १८४४ | ११०१ | १०६३ | |
| ,, | ,, | २३ | डी. सी. एम्. स्कूल भोकरवाडी नाना पेठ .... | ... | ५८ | ५८ | ५१·६ | ३२· | ... | .... | ... | १०२५ | ४८० | ६८५ | |
| ,, | ,, | २४ | एम्. इ. सोसायटीचें गर्ल्स स्कूल डे० जिमखाना... | ... | ७३ | ७३ | ६८·४ | ५९·२ | ४ | २ | ६ | २०६६ | ७२० | ८७० | |
| ,, | ,, | २५ | सेंट हिल्डाज गर्ल्स स्कूल पंच हौद शुक्रवार ... | .... | १९१ | १९१ | १९३· | १६५·९ | १ | ९ | १० | ५८१४ | २३३७ | २३९४ | |
| ,, | ,, | २६ | सेवासदन क्लासेस फॉर ग्रोन अप वुइमेन ... | ... | ११७ | ११७ | ११५· | ९८· | ... | ९ | ९ | ८२४७ | १७१० | १६२५ | |
| ,, | ,, | २७ | स्त्री शिक्षण प्रसारक मंडळीचें गर्ल्स स्कूल ... | .... | २४४ | २४४ | २३९·५ | १७१·९ | ... | ६ | ६ | २५१० | १७११ | २१५१ | |
| ,, | ,, | २८ | यु. एफ्. सी. एम्. गर्ल्स स्कूल रविवार .... | .... | १०३ | १०३ | ९३· | ६२· | .... | ५ | ५ | २९१९ | १२३७ | ९४१ | |
| उ. | ,, | २९ | यु. एफ्. सी. एम्. उर्दू गर्ल्स स्कूल नाना पेठ ... | १९ | ८० | ९९ | ९०·१ | ५९·७ | १ | २ | ३ | २५४० | ७७५ | ७८७ | |
| म. | ,, | ३० | एम्. इ. सोसायटीज गर्ल्स स्कूल ... | ८ | २११ | २१९ | २२५·८ | १८५·८ | ... | १० | १० | ... | .... | ४००८ | |
| | | ३० | | ३८९० | १६१० | ५१०० | ४९११·१ | ४०१८·९ | | | | | | | |

## परिशिष्ट ७ अ "ब" वर्ग शाळा.

सन १९२९-३० सालांतील दिवसाच्या मदर्शांच्या शाळांसंबंधी पटावरील मुलें, हजेरी वगैरे माहितीचा नकाशा.

| शाळेचें वर्णन (म. मराठी, गु. गुजराथी, उ. उर्दू, ता. तामिळ, इं. इंग्रजी) | शाळेचें वर्णन (बी. मुलांची, जी. मुलींची, एम्. मिश्र, एन्. रात्रीची) | अनुक्रम नंबर | शाळेचें नांव | ३१ मार्च १९३० रोजी विद्यार्थ्यांची संख्या: मुलगे | मुली | एकूण | पटावरील सरासरी संख्या | सन १९२९-३० सालची सरासरी हजेरी | शिक्षकांची संख्या: पुरुष | स्त्री | एकूण | सन १९२९-३० सालचे खर्चाची दाखविलेली रक्कम | दिलेली ग्रँट: १९२८-२९ | १९२९-३० | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म. | बी. | १ | सी. एम् ज्यू. एम्. स्कूल, भांबुर्डा ... | ४१ | १४ | ५५ | ५२·० | ३९·६ | १ | ३ | ४ | ९६१ | १६६ | ११४ | |
| " | " | २ | डी. पी. कोंढरकर स्कूल, वेताळ पेठ .... | ४५ | .... | ४५ | ४३·८ | ३२·५ | १ | ... | १ | ४८९ | ९३ | ९६ | |
| " | " | ३ | डी. एस्. मारी स्कूल, गंजपेठ | ४७ | .... | ४७ | ४९·९ | ३९·३ | २ | ... | २ | ६०६ | १५२ | १५६ | |
| " | एम् | ४ | एम्. इ. मिशन स्कूल, नाना पेठ ... | ४३ | ३६ | ७९ | ६६·५ | ४६·५ | १ | १ | २ | ४६५ | ६१ | ६८ | |
| " | " | ५ | एम्. इ. मिशन स्कूल, गंज पेठ .... | ३९ | ४१ | ८० | ५५·२ | ३४·७ | .... | २ | २ | ३५२ | ९५ | ७८ | |
| " | " | ६ | रामेश्वर व्यापारी स्कूल, वेताळ पेठ ... | ३२ | १ | ३३ | ३०·२ | २३·५ | १ | ... | १ | ४४९ | ११२ | ७८ | |
| " | " | ७ | मद्रेसा फैजुल इस्लाम, न्याहाल पेठ .... | ४१ | १९ | ६० | ६२·३ | ५५·० | २ | .... | २ | ९४३ | १६५ | १६६ | |
| एन्. | एन्. | ८ | डी.सी.एम्.नाईट,स्कूल भोकरवाडी,नाना पेठ | २६ | ... | २६ | २९·२ | १३·९ | १ | ... | १ | १५१ | ३८ | ३६ | |
| उ. | जी. | ९ | मुन्शी अब्दुल कादर स्कूल, रविवार पेठ | ... | ४२ | ४२ | ४३·८ | ३१·८ | ३ | .... | ३ | ४८० | १४५ | १६२ | |
| म. | बी. | १० | नूतन समर्थ विद्यालय, शुक्रवार पेठ ... | १०१ | .... | १०१ | १११·१ | ८०·८ | ३ | .... | ३ | ११७२ | .... | ३३६ | |
| | | | एकूण | ४१५ | १५३ | ५६८ | ५४४ | ३९७·६ | १५ | ६ | २१ | ५६६८ | १०२७ | १२८६ | |

पुणें सिटी म्युनिसिपालिटी
स्कूलबोर्ड आफिस
ता. २ आगस्ट १९३०

जी. बी. वावळे.
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर,
स्कूलबोर्ड पुणें सिटी म्युनिसिपालिटी.

# परिशिष्ट ८

सन १९२९-३० सालच्या रात्रींच्या शाळांविषयीं माहिती दाखविणारा तक्ता.

| शाळेची माहिती | | अनुक्रम नंबर | शाळेचें नांव | मुलांची संख्या | | | पटावरील सरासरी मुलें | रुन १९२९-३० सालांतील सरासरी हजेरी | शिक्षकांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म. मराठी, ग. गुजराथी, उ. उर्दू, त. तलगू, | बी. मुलांची, जी. मुलींची, एम्. मुलामुलींची | | | मुलगे | मुली | एकूण | | | | |
| म. | एम्. | १ | पेठ भांबुर्डा रात्रींची शाळा.... ... ... | १४ | ५ | १९ | २१·२ | १५·८ | १ | |
| म. | एम्. | २ | पेठ नवीं रात्रींची शाळा... ... ... | १४ | १० | २४ | १६·९ | १२·९ | १ | |
| म. | एम्. | ३ | पेठ मंगळवार रात्रींची शाळा... .... .... | १४ | ४ | १८ | १४·० | १२·० | १ | |
| म. | बी. | ४ | पेठ भांबुर्डा रात्रींची शाळा.... ... ... | १६ | ... | १६ | २३·० | १०·६ | १ | |
| म. | बी. | ५ | पेठ गंज रात्रींची शाळा... ... .... | १४ | ... | १४ | ८·० | ५·६ | १ | |
| म. | बी. | ६ | पेठ घोरपडे रात्रींची शाळा.... ... .... | १५ | ... | १५ | १८·९ | १३·६ | १ | |
| म. | एम्. | ७ | पेठ भांबुर्डा रात्रींची शाळा... ... ... | १९ | ३ | २२ | १९·६ | १०·६ | १ | |
| म. | एम्. | ८ | पेठ गणेश रात्रींची शाळा.... ... ... | ११ | ५ | १६ | ११·० | ८·० | १ | |
| म. | बी. | ९ | पेठ नाना रात्रींची शाळा ... ... ... | २२ | ... | २२ | २०·५ | १२·४ | १ | |
| म. | बी. | १० | पेठ गंज रात्रींची शाळा... ... ... | २२ | .... | २२ | ३०·६ | ११·५ | १ | |
| उ. | ,, | ११ | पेठ कसबा रात्रींची शाळा... .... ... | १५ | ... | १५ | १४·५ | ६·६ | १ | |
| ,, | ,, | १२ | पेठ गंज रात्रींची शाळा... ... ... | २० | ... | २० | २०·० | ९·७ | १ | |
| ,, | ,, | १३ | पेठ गणेश रात्रींची शाळा... .... ... | १५ | .... | १५ | १३·० | ६·२ | १ | |
| ,, | ,, | १४ | पेठ नाना रात्रींची शाळा... ... ... | २१ | ... | २१ | १६·० | ११·० | १ | |
| ,, | ,, | १५ | पेठ सोमेश्वर रात्रींची शाळा.... .... ... | ५० | ... | ५० | ५०·० | ३४·८ | १ | |
| | | | एकूण | २८२ | २७ | ३०९ | २७७·२ | १८१·३ | १५ | |

# सामान्य माहिती.

———:o:———

( चेअरमन, स्कूलबोर्ड यांजकडील ).

## सक्तीचें शिक्षण.

सरकारनीं आपला शिक्षणखात्याचा ठराव नं. एस्. ८६ ( ४८ ) ता. २२ मार्च १९२९ नें कांहीं अटींवर सक्तीच्या शिक्षणाची योजना मंजूर केली. पुष्कळ अडचणी असून-सुद्धां ही योजना अंमलांत आणण्याचें बोर्डांनीं आधींच ठरविलें होतें. या धोरणास अनुसरून सक्तीच्या भागांतील मुलांची नवीन खानेसुमारी करण्याची तजवीज स्कूलबोर्ड व लोकल अथारिटी यांनीं ताबडतोब केली. हें प्रास्ताविक काम जुलै १९२९ अखेर संपलें व रजिस्टरें तयार करण्यांत आलीं. एकंदर या कायद्याच्या कक्षेंत येणारीं १३१६ मुलें नोंदण्यांत आलीं, व सक्तीच्या भागांत शिफ्ट पद्धतीवर १२ शाळा ता. २–१२–१९२९ पासून उघडण्यांत आल्या.

या शाळांत शिक्षेच्या तजविजींचा अंमल करण्याकरितां व मुलांस शाळेंत येण्यास भाग पाडण्याकरितां अटेंडन्स ऑफिसराची एक जागा निर्माण करण्यांत आली व ती १६ मे १९२९ रोजीं भरली गेली. येथें हेंहि नमूद केलें पाहिजे कीं, सरकारनीं एक अटेंडन्स ऑफिसर व एक शिपाई अशा दोनच जागा मंजर केल्या व एका कारकुनाचा पगार व सेन्ससच्या कामाचा खर्च नामंजूर केला. सक्तीचें शिक्षण योग्य रीतीनें चालू करण्यास सेन्ससचें काम पूर्व तयारीच्या दृष्टीनें अगदीं जरूर आहे. म्हणून सध्यां चालू असलेली व्यवस्था लोकल अथारिटीनें प्रयोग म्हणन अशीच पुढ चाल ठेवावी अशी सूचना आहे. अशा प्रकारचा सर्व खर्च मंजूर करून स्कूलबोर्डाचें काम सुलभ करणें सरकारचें कर्तव्य होतें. यामुळें सक्तीचें शिक्षण यशस्वी झालें असतें.

आतांपर्यंतच्या अनुभवावरून असें दिसतें कीं शिफ्ट पद्धतीच्या शाळा लोकप्रिय होत नाहीत. कारण अशा शाळांत पुरेसें शिक्षण मिळत नाहीं असें आईबापांस वाटतें. सक्तीच्या भागांत पुरा वेळ भरणाऱ्या कांहीं शाळा म्युनिसिपालिटीनें ऐच्छिक पद्धतीवर बरेच दिवसांपासून चालविल्या आहेत. सबब आतां सरकारकडे असें कळविण्यांत आलें आहे कीं शिफ्ट पद्धतीच्या शाळा पुऱ्या वेळच्या करण्यांत याव्या व वर उल्लेख केलेल्या कांहीं शाळा वाढवून मोठ्या करण्यांत याव्या. यामुळें आईबापांच्या इच्छेप्रमाणें सक्तीच्या वयांतील मुलांना पुऱ्या वेळच्या शाळांमध्यें शिक्षण देणें म्युनिसिपालिटीस शक्य होईल. शिक्षणखात्याचे डेप्युटी डायरेक्टर मि. ग्रीव्ह यांच्याशी ता. २०–२–३० रोजीं मुलाखत झाली. त्यावेळीं असें ठरलें कीं सरकारा-वर जर जास्त खर्चाचा बोजा पडत नसेल, तर वर निर्दिष्ट केलेला फेरबदल करण्यास म्युनिसि-पालिटीस सरकार हरकत घेणार नाहीं. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर ( जून १९३० मध्यें ) जेव्हां शाळा उघडतील तेव्हां हे फेरबदल करण्यांत येतील. ही योजना यशस्वी होणें हें म्युनिसिपालिटी, सरकार व नागरिक यांच्या सहकारितेवर अवलंबून आहे. नागरिक लोक शिक्षणाचें महत्व जाणतील व सक्तीशिवाय आपल्या मुलांना शाळेंत पाठवितील अशी स्कूलबोर्डास आशा आहे.

म्हणून म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांनीं गव्हर्नमेंटला पत्र नंबर ७३ ता. १३।६।३० नें लिहिलें कीं, लोकल ॲथॉरिटीला स्कूल बोर्डानें सुचविल्याप्रमाणें शाळेच्या वेळा बदलून सबंध वेळेच्या शाळा कराव्यात, कारण त्यांत सरकारला अधिक खर्च येत नाहीं; या गोष्टीला सरकार लवकर मंजुरी देईल अशी आशा आहे.

## रात्रींच्या शाळा.

रिपोर्टाच्या सालांत रात्रींच्या शाळांची प्रगति विशेष झाली नाहीं याचें कारण या शाळांतील विद्यार्थ्यांची स्थलांतर करण्याची प्रवृत्ति होय. शिक्षक निरिच्छपणानें व शुद्ध मिशनरी पद्धतीनें जोंपर्यंत काम करणार नाहींत, तोंपर्यंत रात्रींच्या शाळांचा प्रश्न मनाजोगा सुटणार नाहीं. आम्ही ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांचेबरोबर अशा शाळांना कांहीं भेटी दिल्या व आम्हांस असें दिसून आलें कीं अशा शाळा परोपकारी किंवा पंचायत संस्थेला जोडाव्या अगर जे निरक्षरांना साक्षर करण्यांत मन घालून काम करणारे मुतवल्ली असतील यांना द्याव्या. पाश्चिमात्य देशांत रात्रींच्या शाळा क्लबांच्या धर्तीवर चालविल्यामुळें प्रौढ माणसांस शिक्षण देणें यशस्वी झालें आहे. कारण तेथें करमणूक व शिक्षण यांची सांगड घातली जाते. तेथें शाळांत राजकीय चर्चा, वाचण्यास मोफत वर्तमान पत्रें व मासिकें व मॅजिक लँटर्नच्या साहाय्यानें निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देण्यांत येतात.

हल्लीं शाळेंत जाण्याच्या वयाच्या मुलांना ज्या पद्धतीनें आपण शिक्षण देतों, त्याच प्रकारानें जर प्रौढांनाहि लेखन, वाचन व गणित शिकविण्याचा प्रयत्न केला तर रात्रींच्या शाळा यशस्वी होणें अशक्य आहे. या शाळा उत्तमरीतीनें चालविणें अत्यंत जरूर आहे असें माझें मत आहे. कारण रात्रींच्या शाळांमुळें निरक्षरता नाहींशी होण्यास मदत होते. म्हणून माझें असें आग्रहपूर्वक सांगणें आहे कीं प्रयोग म्हणून तरी ज्या योगानें रात्रींच्या शाळा भरभराटीस येतील असे उपाय योजण्यांत यावे.

## शिक्षकांचें पगाराचें शेड्यूल.

शिक्षकांच्या शेड्यूलसंबंधीं पूर्वींचे चेअरमन मे. जगताप यांचा अभिप्राय अजून लागू पडत आहे. प्राथमिक शिक्षकांचें ३०० जागांचें शेड्यूल पत्र नं. ५ ता. ७ एप्रिल १९२६ नें सरकारकडे पाठविण्यांत आलें. त्या शेड्यूलला चार वर्षें झालीं तरी अजून मंजुरी मिळाली नाहीं. विद्यार्थी वाढल्यामुळें व नवीन वर्ग सुरू केल्यामुळें जे नवीन शिक्षक ठेवावे लागले त्यांच्या पगाराचा खर्च सरकारी ग्रँटच्या आकारणीकरितां सरकारकडून नामंजूर करण्यांत येत आहे. या बाबतींत स्कूल बोर्डानीं डेप्युटी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या दोन मुलाखती घेतल्या व शिक्षणमंत्र्यांची एक मुलाखत घेतली व अशा जुन्या प्रकरणांचा लवकर निकाल लागावा म्हणून प्रयत्न केला. आमच्या लिहिण्याचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें सरकारनीं अभिवचन दिलें, परंतु अजून नक्की उत्तर कांहींच आलें नाहीं.

## प्राथमिक शिक्षणाचा कायदा.

या कायद्याचें कलम १३ प्रमाणें ऐच्छिक तत्त्वावर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं स्थानिक संस्थांस मदत करण्यास सरकार मुळींच बांधलेलें नाहीं. सक्तीचें शिक्षण व ऐच्छिक प्राथमिक शिक्षण या दोहोंचाहि खर्च सरकारनीं सोसला पाहिजे असें ठरविणें जरूर आहे.

पूर्वीचे चेअरमन डॉ. नायडू यांनीं ऐच्छिक शिक्षणासाठीं १३ नवीन शाळा सुरू केल्या, त्यांचा सर्व खर्च (अनुकूल विचार करण्याचें पूर्वी अभिवचन देऊनसुद्धां) सरकार नामंजूर करीत आहे; ही गोष्ट पूर्वीच्या दोन रिपोर्टांत सरकारच्या निदर्शनास प्रामुख्यानें आणली होती. या गोष्टींत सरकारनें जी कठोर वृत्ति स्वीकारली आहे त्याबद्दल मला खेद होत आहे. पुणें हें वाढतें शहर आहे व या शहरास जी मदत करणें वाजवी आहे ती मदत तें निग्रहानें मागत राहील हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

## शाळागृहें.

खालीं दिल्याप्रमाणें तीन शाळागृहें लोकल अथॉरिटीनें स्कूल बोर्डाच्या ताब्यांत दिलीं आहेत:—

| | नांव | तारीख |
|---|---|---|
| १. | शनिपारजवळील मुलींची शाळा नं. ४ | २१—१—१९२९ |
| २. | रविवार पेठेंतील मुलांची उर्दू शाळा नं. १० | ८—६—१९२९ |
| ३. | भंगी हद्दींतील शाळा, भवानी पेठ | २८—९—१९२९ |

कसबा पेठेंतील इमारतीचें काम अद्याप चालू आहे. ती इमारत शाळा नं. ८ करितां लवकरच स्कूलबोर्डाचे ताब्यांत येईल असें वाटतें.

अर्वाचीन उपकरणांनीं युक्त अशीं प्रशस्त शाळागृहें बांधून प्राथमिक शिक्षणाच्या इतिहासांत म्युनिसिपालिटीनें नवीनच स्मरणीय उपक्रम सुरू केला आहे. पुढील थोड्याच वर्षांत सभोंवार क्रिडांगणें असलेल्या व हवा व उजेड यांनीं युक्त अशा म्युनिसिपालिटीच्या शाळागृहांमध्यें आपलीं लहान लहान मुलें शिकत असलेलीं पाहण्याचा सुयोग पुणेकरांस लाभेल असें मला वाटतें.

## प्राथमिक–शिक्षण–कॉन्फरन्स.

वांद्रें येथें ता. २८ व २९ सप्टेंबर १९२९ रोजीं प्राथमिक–शिक्षण–परिषदेचें तिसरें अधिवेशन भरलें होतें. व्हाइस चेअरमन मि. इराणी व सभासद श्री. पां. ना. राजभोज यांस स्कूलबोर्डानें या परिषदेकरितां मुद्दाम पाठविलें होतें.

## नामदार गव्हर्नर यांची भेट.

सर फ्रेडरिक साइक्स, मुंबईचे गव्हर्नर, यांनीं मुलांची शाळा नं. १ ला ता. २३।८।२९ रोजीं व मुलींची शाळा नं. ४ ला ता. ४—९—२९ रोजीं भेट दिली, हें नमूद करण्यास मला फार आनंद होत आहे. इलाखाधिपतींनीं म्युनिसिपल प्राथमिक शाळांस भेट दिल्याचें हें बहुधा पहिलेंच उदाहरण आहे. त्यांनीं प्रत्येक शाळेंत आपल्या परिवारासुद्धां अर्धा तास खर्च केला व शाळांचें काम पाहून त्यांचे समाधान झालें, व त्याप्रमाणें त्या शाळांच्या व्हिजिट् बुकांत नामदार–साहेबानीं शेरे लिहिले आहेत. ते शेरे या रिपोर्टांत दुसरीकडे दिले आहेत.

## शारीरिक शिक्षण.

या बोर्डास या विषयाचें महत्व पूर्णपणें मान्य आहे. शारीरिक शिक्षण कमिटीचे ठराव आतां बाहेर पडले आहेत, व पैशाच्या टंचाईची नेहमीची सबब पुढें आणून सरकार हा रिपोर्ट बाजूस सारणार नाहीं अशी आशा आहे. वार्षिक चढाओढीच्या सामन्यांचा खर्च नामंजूर करण्याची सरकारची सध्याची पद्धत अतिशय असमाधानकारक आहे. शरीर व मन यांचा विकास बरोबरीनें झाला पाहिजे हें तत्त्व कोणाहि शिक्षणतज्ञास मान्य करावें लागेल. म्हणून अशा महत्वाच्या कामावरहि सरकार ग्रँट देण्याचें नाकारतें हें पाहून खेद होतो. या वर्षी वार्षिक खेळाचे सामने १९२९ च्या आक्टोबर महिन्यांत करण्यांत आले. ता. २७।१०।१९२९ रोजीं बक्षिस-समारंभ झाला त्यावेळीं नामदार सर गुलाम हुसेन अध्यक्ष होते. सरकारी ग्रँट मिळो न मिळो, या समारंभास ५०० रु. खर्च करावे असें म्युनिसिपालिटीनें ठरविलें होतें. म्युनिसिपालिटीच्या या उदार व मनःपूर्वक सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

## समारंभ

नामदार मौलवी रफिउद्दीन, शिक्षणमंत्री, यांचे हातून मुलांची शाळा नं. १० ( उर्दू ) या शाळागृहाचा अनावरण समारंभ ता. ६–७–२९ रोजीं मोठ्या उत्साहानें करण्यांत आला. हा समारंभ फार यशस्वी झाला व समारंभास लोकहि पुष्कळ आले होते.

म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष श्री. ह. वि. तुळपुळे यांच्या हस्तें ता. २–१२–१९२९ रोजीं सक्तीच्या भागांत पहिली उर्दू मुलींची शाळा उघडण्यांत आली. ता. १४–१२–१९२९ रोजीं अस्पृश्यांकरितां भंगी हद्दींतील शाळागृह डॉ. सोळंकी यांचे हातून उघडण्यांत आलें. या समारंभासहि पुष्कळ प्रेक्षक आले होते.

बोर्डाच्या इच्छेस मान देऊन पुष्कळ गैरसोय सोसूनहि समारंभ साजरा करणाऱ्या वरील सर्व प्रसिद्ध पुरुषांचे बोर्ड फार आभारी आहे.

## बालदिन

हेड मास्तर आणि शिक्षण खात्याचे अधिकारी यांच्या फिरत्या क्लबाचेमार्फत तारीख २२–३–३० रोजीं बालदिनाचा समारंभ मोठ्या उत्साहानें पार पाडण्यांत आला. सांधिक कवाइतीस एकंदर १५१० मुलें आलीं होतीं. त्यांपैकीं ८०० म्युनिसिपालिटीच्या शाळांतील होतीं, व मिरवणुकीमध्यें म्यु. शाळांतील मुलें सामील झालीं होतीं. या दिवसाचा कार्यक्रम पार पाडण्यांत या बोर्डानें महत्वाची कामगिरी केली होती; व क्लबाचे चिटणीस, श्री. तावडे, यांच्या सहकार्यानें सर्व गोष्टी यथास्थित पार पडल्या, व याबद्दल बोर्ड त्यांचे आभार मानीत आहे.

शहरच्या लोकसंख्येच्या मानानें शाळेंत जाण्याच्या वयाचीं सरासरी १८,००० मुलें शहरांत असलीं पाहिजेत. या वर्षीच्या रिपोर्टावरून दिसून येईल कीं, १०,५०० मुलें म्युनिसिपालिटीच्या शाळांचा फायदा घेतात व ६,००० मुलें खासगी शाळेंत जातात. यावरून स्पष्ट होतें कीं, शाळेंत न जाणारीं अशीं मुलें फक्त १,५०० च शिल्लक आहेत.

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं, पुण्यांतील नागरिकांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय बहुतेक पूर्णपणें करण्यांत आली आहे. एवढी तजवीज केली म्हणजे म्युनिसिपालिटीचें कर्तव्य संपलें असा यावरून अर्थ काढावयाचा कीं काय ?

माझ्यामतें येथपर्यंत कर्तव्याचा एकच भाग संपला. याहून अधिक व्यापक व अधिक कठिण असें काम पुढेंच सुरू व्हावयाचें आहे. आमचें कर्तव्य भरपूरपणें पार पाडण्याकरितां हर्टाग व हेस्केथ कमिट्यांनीं ज्या शिफारशी केल्या आहेत त्यांस अनुसरून प्राथमिक शिक्षणाची पद्धति शोधून काढून ती अमलांत आणिली पाहिजे. भविष्यकाळीं जे फेरफार करणें अवश्य होणार आहे असे फेरफार सध्यांच्या परिस्थितींत आपलेसें करून शिक्षणक्रम व शाळा चालविणें हेंच स्कूल बोर्डाचें सध्यांचें काम आहे. या हेतूच्या सिद्धीकरितां पहिली पायरी म्हणजे जास्त सुपरवायझर नेमणें. सुपरवायझर नेमण्याच्या बाबतींत जर प्राथमिक शिक्षणसंबंधीं केलेल्या नियमांस आपण चिकटून राहिलों तर सुधारलेल्या शिक्षणपद्धतीचाही बिलकूल उपयोग होणार नाहीं.

यापुढें प्राथमिक शिक्षणाची सुधारणा करण्याची जबाबदारी आपल्यावरच आहे हीं जाणीव बोर्डास आहे व म्युनिसिपालिटीच्या मदतीनें बोर्ड आपलें कर्तव्य बजावील अशी मला आशा आहे.

या सालांत मुसलमानांच्या शिक्षणाची प्रगति आमच्या कल्पनेच्याहि बाहेर झाली आहे व या अत्यंत श्रमसाध्य व कठीण बाबतींत स्कूल बोर्ड व लोकल अथॉरिटी यांनीं जें काम केलें तें नागरिकांपुढें मांडण्यास मला फार आनंद होत आहे. मुसलमानांची लोकसंख्या सुमारें १३,००० असावी असा अंदाज आहे. लोकसंख्येपैकीं शेंकडा १५ इतकी संख्या शाळेंत जाणाऱ्या वयाच्या मुलांची असते. हीं संख्या १९५० येते.

ता. ३१–३–१९३० रोजीं म्युनिसिपल उर्दु शाळांतील पटावरील मुलांची संख्या १,३६८ होती. खासगी उर्दु शाळांमध्यें सुमारें ४०० मुलें असावींत असें धरून चालूं. या आंकड्यांवरून स्पष्ट होतें कीं, शाळांत जाणाऱ्या वयाचीं बहुतेक सर्व मुलें शाळेंत जात आहेत. फक्त २०० मुलें बाहेर आहेत व त्यांत बहुधा सर्व मुलीच असाव्या.

शिक्षणांत मागासलेल्या जातींत लेखनवाचनाचें ज्ञान कायम टिकण्यास त्यांच्या सामाजिक चाली व त्यांचें दारिद्र्य यांची अडचण येते. मूल काम करण्यासारखें झालें असें दिसतांच त्याचे आईबाप त्यास कोठें तरी नोकरींत गुंतवितात. यामुळेंच वरच्या वर्गांत विद्यार्थी कमी राहतात.

मुसलमान मुलींच्या शिक्षणाविषयीं विचार करितां या बाबतींत अजून पुष्कळच औदासीन्य दिसून येतें व मुलींचें शिक्षण मागासलेलेंच आहे. पहिली यत्ता संपतांच पुष्कळ मुलींच्या पालकांस पडदापद्धतीमुळें मुली शाळेंतून काढणें भाग पडतें. सर्व सोयी करून एक मोटार लॉरी स्कूलबोर्डास नजर केल्याबद्दल मि. दोस्तमहंमद पीरमहंमद यांचे आभार मानले पाहिजेत. यामुळें आतां पडद्यांतील मुलींस शाळेंत जाण्यास अडचण पडणार नाहीं. नेहमींच्या विषयांखेरीज, स्वयंपाक कपडे धुणें वगैरे घरगुती कामें जेथें शिकविण्यांत येतील असें एक मुलींचें उर्दू सेंट्रल स्कूल काढण्याचें म्युनिसिपालिटीनें ठरविलेंच आहे.

शिक्षणामध्यें दुसऱ्या जातींच्याबरोबर मुसलमानांनीं यावें अशाबद्दल म्युनिसिपालिटीनें प्रयत्न केला आहे असें पुण्यांतील मुसलमानांस समजून येईल. व या संधीचा पूर्ण फायदा घेण्यास माझे बंधु आळस करणार नाहींत अशी मी आशा करितों. मुसलमानांच्या शिक्षणासंबंधीं आणखी तपशीलवार माहिती या बाबतींत ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर यांनीं जें टिपण दिलें आहे त्यांत मिळेल.

( ६ )

## लोकल अथॉरिटी व नोकरवर्ग यांचे आभार.

प्रत्येक अडचणीच्यावेळीं लोकल अथॉरिटीनें जें मन:पूर्वक सहकार्य केलें त्याबद्दल जर त्यांचे आभार मानले नाहींत, तर मी आपल्या कर्तव्यांत चुकलों असें होईल. लोकल अथॉरिटी व हें स्कूल बोर्ड यांचा संबंध नेहमीं प्रेमाचा राहिला आहे याबद्दल माझ्या बोर्डास अभिमान वाटत आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानें ऑफिसच्या नोकरवर्गावर पुष्कळच जबाबदारी व कामाचा बोजा लादला आहे. अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री. गो. बा. वाबळे व त्यांचे हाताखालचे लोक यांनीं आपलें काम इमानेंइतबारें केलें याची मला पूर्ण जाणीव आहे हें येथें मी आनंदानें नमूद करीत आहें. अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर व त्यांचे नोकर यांचे आभार स्कूल बोर्ड मानीत आहे. हा रिपोर्ट बारकाईनें वाचल्यास असें दिसून येईल कीं, या वर्षी शिक्षणाचा कारभार यशस्वी रीतीनें करण्यांत आला आहे व शिक्षकांच्या मन:पूर्वक केलेल्या सहकार्यामुळेंच हें घडून आलें. या शिक्षकांनींच अलीकडील परीक्षांमध्यें स्कॉलरशिपा व बक्षिसें मिळवून देऊन बोर्डास यश दिलें आहे. या यशाबद्दल सर्व शिक्षकांचे या प्रसंगीं मी आभार मानीत आहे.

**महंमदअली दोस्तमहंमद पीरमहंमद,**
**चेअरमन, स्कूल बोर्ड: पुणें सिटी म्युनिसिपालिटी.**

# पुणें शहर म्युनिसिपालिटी

## स्कूल्स कमिटीचा वार्षिक अहवाल.

## सन १९२९–३०.

मे. अध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी,

यांचेकडे.

ग. का. देशपांडे, बी. ए., एल्एल्. बी. ( वकील ),

चेअरमन, स्कूल्स कमिटी, पुणें शहर म्युनिसिपालिटी, पुणें शहर.

यांचेकडून.

---

सन १९२९-३० चा स्कूल्स कमिटीच्या कारभारासंबंधीं अहवाल खालीलप्रमाणें सादर करींत आहे.

**स्कूल्स कमिटीची घटनाः—**स्कूल्स कमिटीचे सभासद ता. १ सप्टेंबर १९२९ रोजीं बदलले व खालील पांच सभासदांची नवीन स्कूल्स कमिटी नेमण्यांत आलीः—

**चेअरमन**

१ मे० ग. का. देशपांडे, बी.ए., एल्एल. बी.

**सभासद**

२ मे० पोपटलाल रामचंद्र शहा
३ ” रंगोबा ग्यानोबा लडकत
४ ” भागूजी अनाजी बारणे
५ ” गणपत महादेव नलावडे

**स्कूल्स कमिटीच्या सभाः—**१ एप्रिल १९२९ ते ३१ मार्च १९३० पर्यंत स्कूल्स कमिटीनें १८ सभा बोलाविल्या. १२ महिन्यांत एकंदर भरलेल्या सभांची संख्या १२ होती. ह्या वर्षीं कामाच्या १७० विषयांची तजवीज करण्यांत आली.

खालील तक्त्यावरून स्कूल्स कमिटीच्या सभासदांची ह्या वर्षाची हजिरी कळून येईलः—

१ एप्रिल १९२९ ते ३ सप्टेंबर १९२९.

चेअरमन

| | | |
|---|---|---|
| १ | मे० ग. का. देशपांडे, बी. ए., एल्एल्. बी. | ४ |

सभासद्

| | | |
|---|---|---|
| २ | मे० गेनूजी दगडूजी शिंदे | ३ |
| ३ | ,, विठ्ठल रामजी गुजर | २ |
| ४ | ,, सुभेदार रावोराम सज्जन घाडगे | ४ |
| ५ | ,, धोंडिबा गोविंद भोसले | १ |

ता. ४–९–२९ ते ३१–३–३०.

चेअरमन

| | | |
|---|---|---|
| १ | मे० ग. का. देशपांडे, बी. ए., एल्एल्. बी. | ९ |

सभासद्

| | | |
|---|---|---|
| २ | मे० पोपटलाल रामचंद्र शहा | ७ |
| ३ | ,, रंगोबा ग्यानोबा लडकत | ९ |
| ४ | ,, भागूजी अनाजी वारणे | ६ |
| ५ | ,, गणपत महादेव नलावडे | ५ |

म्युनिसिपालिटीची व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल ही एकच संस्था स्कूल्स कमिटीच्या खास व्यवस्थेखालीं होती व तिचा रिपोर्ट खालीं दिला आहे.

**टेक्निकल स्कूलः**—ह्या वर्षाच्या अखेर व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल मधील विद्यार्थ्यांची पटावरील संख्या ७६ पासून ८० पर्यंत वाढली. (७२ सबंध दिवस व ४ अर्धा दिवसांपासून ७२ संबंध दिवस व ८ अर्धा दिवसपर्यंत.) आणि विद्यार्थ्यांची दर महिन्याची सरासरी हजिरी ६० होती. ड्रॉइंग, सुतारी, नांवाच्या पाट्या रंगविणें, लोहारी, फिटिंग, टर्निंग, मोल्डिंग व वायरमनचें काम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८० होती. ह्यापैकीं ५६ ब्राम्हण होते, २२ मराठे होते, एक मुसलमान होता व एक ज्यू होता.

ज्या स्थानिक विद्यार्थ्यांना कोणत्याही शाळेचे रीतसर विद्यार्थी होता येत नाहीं अशा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं ह्या टेक्निकल स्कूलमध्यें ड्रॉइंगचा एक खास वर्ग चालविला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडून चार आणे फी घेण्यांत येते. तरीपण म्युनिसिपालिटीच्या शाळांतील व ट्रेनिंग कॉलेजमधील ह्या वर्गास हजर राहणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांकडून फी आकारली जात नाहीं. ह्या वर्षी ह्या वर्गाला सरासरी १७ विद्यार्थी हजर होते.

मुंबईच्या स्कूल ऑफ आर्टस्च्या एलिमेंटरी (प्राथमिक) व इंटरमीजिएट (मध्यम) परिक्षांना ही शाळा उमेदवार पाठविते. ह्या वर्षी एलिमेंटरी परिक्षेला २७ विद्यार्थी पाठविले त्यांपैकीं १० पास झाले व इंटरमिजिएट परिक्षेला ६ विद्यार्थी पाठविले त्यांपैकीं २ पास झाले.

मुंबईच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल संस्थेमध्यें अंमलात असलेल्या नियमाप्रमाणें शाळेची वार्षिक परिक्षा घेण्यांत आली व ही परीक्षा ह्या इलाख्यांतील टेक्निकल शिक्ष-

णाच्या डिरेक्शन कमिटीनें नेमलेल्या परीक्षकांच्या खास देखरेखीखालीं घेण्याची तजवीज केली होती. खालील तक्त्यावरून निरनिराळ्या वर्गांच्या परीक्षांचा निकाल समाधानकारक आहे हें कळून येईल.

| वर्ग | १९२८-२९ | | १९२९-३० | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | पाठविलेल्यांची संख्या | पास झालेल्यांची संख्या | पाठविलेल्यांची संख्या | पास झालेल्यांची संख्या | |
| १ लें वर्ष | २० | २० | २२ | २१ | |
| २ रें वर्ष | १७ | १४ | १७ | १५ | |
| ३ रें वर्ष | १५ | १४ | १८ | १७ | |
| ४ थें वर्ष ( मिस्त्रीचा वर्ग) | ६ | ६ | १५ | १५ | |

**वार्षिक ग्रँटः**—ह्यावर्षी ह्या इलाख्यांतील धंदे शिक्षणाच्या व्यवस्थापक कमिटीच्या शिफारशीप्रमाणें सरकारकडून ह्या टेक्निकल स्कूलला रु. २, २४६ ची ग्रँट मिळाली.

स्कूल्स कमिटीच्या सभासदांनीं आणि म्युनिसिपालिटीच्या कौन्सिलरांनीं ह्यावर्षी वेळोवेळीं शाळेला आकस्मिक भेटी दिल्या.

टेक्निकल शिक्षणाचें सरकारी इन्स्पेक्टिंग अधिकाऱ्यांनीं जून १९२९ मध्यें ही शाळा तपासली आणि मार्च १९३० च्या दुसऱ्या आठवड्यांत ह्या शाळेची वार्षिक परीक्षा घेतली. त्या सर्वांनीं शाळेच्या कामाविषयीं समाधान व्यक्त केलें आहे.

ह्यावर्षी सर्व वर्षभर ही शाळा श्री. रा. त्रिं. साठे ह्यांच्या खास देखरेखीखालीं होती. ते मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियर आहेत आणि पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजमध्यें त्यांनीं नॉर्मल क्लासचें विशेष शिक्षण घेतलें आहे. टेक्निकल शाळेचे शिक्षक म्हणून ते लायक आहेत. व प्रत्यक्ष कामाचा त्यांना अनुभव आहे. टेक्निकल शाळा आतां सुधारत आहे आणि सध्यांच्या सुपरिंटेंडटच्या प्रयत्नामुळें ही शाळा चांगलें काम करीत आहे. सुपरिंटेंडटखेरीज करून टेक्निकल शाळेच्या नोकर वर्गामध्यें सुतारकाम, ड्रॉइंग, पेन्टिंग, लोहारी, इंग्रजी व अंकगणित, टर्निंग, फिटिंग, मोल्डिंग शिकविणारे शिक्षक आहेत आणि वायरमनचे वर्गाकरितां एक इलेक्ट्रिकल मिस्त्री आहे.

**वायरमनचा वर्गः**—वायरमनचा क्लास चालविण्यास जरूर असलेली यंत्रसामुग्री शाळेस यावर्षी पुरविण्यांत आली.

मुंबई सरकारच्या इलेक्ट्रिकल इंजिनियरनीं ह्या शाळेला भेट दिली व येथें तपासली आणि ह्या क्लासाला सरकारी मान्यता मिळण्याबद्दल मे० डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांचेकडे शिफारस केली. मे० डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं मान्यता दिली आहे.

खालील विषय म्हणजे—सुतारी, अनेक तऱ्हेचें ओतीव काम, लाकडाचें व धातूचें कातण्याचें काम, लाकूड कामावर पॉलिश करणें, नांवाच्या पाट्या लिहिणें, सुतारी ड्रॉइंग, मशिन ड्रॉइंग,

आर्ट ड्रॉइंग, लोहारी, टर्निंग, फिटिंग, मोल्डिंग, वायरिंग, छापखान्याचें काम ( कंपोजिंग, छापणें व बुक बाइंडिंग ) आणि इंग्रजी, हे विषय ह्या शाळेंत शिकविले जातात. शिकविण्याबद्दल फी आकारली जात नाहीं.

**स्कॉलरशिप्स ( शिष्यवृत्त्या ):**—दुसऱ्या वर्षाकरितां ३ स्कॉलरशिपा आणि तिसऱ्या व चवथ्या वर्षांच्या वर्गांकरितां २ स्कॉलरशिपा प्रत्येकीं अनुक्रमें दरमहा रु. २, ३ आणि ४ अशा स्कॉलरशिपा म्युनिसिपालिटीनें विद्यार्थ्यांना टेक्निकल शिक्षण घेण्याकरितां प्रोत्साहन मिळणेंसाठीं उघड चढाओढीच्या वेळोवेळीं होणाऱ्या परीक्षांच्या निकालावरून देण्यांत येणाऱ्या ठेवल्या आहेत. त्याशिवाय आणखी एक दरमहा रक्कम रुपये ५ ची दिवाण बहादूर गोडबोले यांची स्कॉलरशिप आहे, व ती तिसरे वर्षाच्या वार्षिक परीक्षेंत ज्या विद्यार्थ्याचा पहिला नंबर येतो त्याला कांहीं अटीवर दिली जाते.

प्रत्यक्ष व प्रयोगाच्या कामासाठीं ही शाळा म्युनिसिपालिटीच्या वर्कशॉपला जोडलेली आहे. दुरुस्त्या व इतर कामें अगदीं नवीन यंत्रांच्या साह्यानें केलीं जातात. लांकूड व धातु वगैरे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठीं लागणारे पदार्थ व लागणारीं हत्यारें विद्यार्थ्यांना ह्या शाळेकडून फुकट पुरविलीं जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या ताब्यांत दिलेल्या हत्यारांच्या तारणार्थ रक्कम रु. १० अमानत ठेवावी लागते. एका वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर केव्हांही शाळा सोडली तरी त्यांना ही रक्कम परत दिली जाते. कामगार लोक वर्कशॉपच्या यंत्रांच्या साह्यानें कशीं कामें करतात व वाफेच्या आणि तेलाच्या एंजिनावर प्रत्यक्ष कामें कशीं करावींत ही माहिती विद्यार्थ्यांना मिळते हा ह्या शाळेच्या विद्यार्थ्यांना मोठा फायदा आहे. ह्यावरून असें दिसून येईल कीं, गेल्या सात वर्षांमध्यें अभ्यास क्रमांत सुधारणा, नवीन उपयोगी वर्ग सुरू करणें, अशा तऱ्हेचे उपाय म्युनिसिपालिटीनें योजल्यामुळें शाळेची स्थिति सुधारली आहे. हल्लींप्रमाणें ह्या शाळेची प्रगति होत गेल्यास पुणें शहरांत धंदेशिक्षणाची ही शाळा समाधानकारक तरतूद करील.

## जमा

**व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूल करतां सरकारी मदत:**—गतवर्षापेक्षां ह्यावर्षी ह्या इलाख्यांतील टेक्निकल शिक्षणाच्या डायरेक्शन कमिटीनें जास्त ग्रँट मंजूर केल्यामुळें ह्या बाबीमध्यें रु० २५२ ची वाढ झालेली आहे.

**ड्रॉइंग ग्रँट:**—ह्या बाबीमध्यें रु० ५ ची वाढ आहे. ह्यावर्षी एकंदर रु० १९१ ड्रॉइंगची ग्रँट मिळाली. ह्या रकमेपैकीं रु० ९१ रिझल्ट ग्रँट आहे आणि रु० १०० ही विशेष ग्रँट आहे.

**टेक्निकल स्कूलची फी:**—ह्या बाबीमध्यें रु० २३-१२-२ कमी आहेत.

**देणग्या:**—ह्यावर्षी बॉबे इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट डिबेंचरवर व्याज म्हणून रक्कम रु० १०२ फक्त मिळाले.

## खर्च

टेक्निकल स्कूलचा खर्च आणि कांहीं विशिष्ट संस्था, मोफत वाचनालयें वगैरेंना दिलेली मदत यांबद्दल सर्व माहिती परिशिष्ट २ मध्यें खुलासेवार दिली आहे. प्रत्येक पोट सदराखालील कमी जास्तीची खुलासेवार माहिती खालीं दिली आहे.

**टेक्निकल स्कूल नोकर वर्गः**—शाळेच्या सुधारलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणें जास्त विषय शिकविण्याबद्दल ह्या शाळेच्या नोकर लोकांपैकीं शिक्षकांना बढत्या दिल्यामुळें ह्या बाबीमध्यें रु. ७१०–८–० ची वाढ झाली आहे.

**टेक्निकल स्कूल कचेरी खर्चः**—ह्या बाबीमध्यें रुपये ९८–५–० ची वाढ झाली आहे.

**यंत्रसामुग्रीः**—ह्यामध्यें रु० २३४–०–१० कमी आहेत.

**एंजिनाच्या व यंत्राच्या दुरुस्त्याः**—ह्या बाबीमध्यें रु० ४–१०–४ ची वाढ झाली आहे.

**खास संस्थानां व मोफत वाचनालयांनां म्युनिसिपालिटीची ग्रँट-इन्-एडः**—ह्यामध्यें रु० १,००० वाढले आहेत.

**सर्व सामान्य सूचनाः**—जीं वाचनालयें व लायब्ररया म्युनिसिपालिटीची ग्रँट घेतात त्यांच्या व्यवस्थेविषयीं व स्थितीविषयीं, गेल्या वर्षांच्या रिपोर्टांत जें वर्णन केलें आहे त्याहून यंदा मला जास्त कांहीं सांगावयाचें नाहीं. आणखी चार संस्था चांगलीं कामें करितात असें दिसून आल्यावरून, एकंदर ग्रँटची रक्कम न वाढवितां, त्यांना, आमच्याजवळ असलेल्या रकमे-तून वाटणी करून ग्रँट दिली आहे. कामाच्या अव्यवस्थितपणामुळें व हिशेब असमाधानकारक असल्यामुळें इतर चार संस्थांची ग्रँट बंद करण्यांत आली.

ह्या म्युनिसिपालिटीच्या ग्रँटचे बाबतींत गेल्या दोन वर्षांचा माझा, कमिटीचा चेअरमन या नात्यानें अनुभव असमाधानकारक आहे. ज्यामध्यें पुष्कळशा बेजबाबदार संस्था आहेत अशा अनेक लायब्ररयांना मदत देण्यापेक्षां म्युनिसिपालिटीनें आपले खास देखरेखीखालीं मध्यवर्ती ठिकाणीं एक मोफत वाचनालय व पुस्तकालय उघडावें व त्याकरितां सदरच्या ग्रँटच्या रकमेचा उपयोग करावा. हल्लीं शहरांत "नगर वाचन मंदिर" "मराठी ग्रंथालय" अशा सारख्या कांहीं नमुनेदार संस्था आहेत व त्या शैक्षणिक कामगिरी उत्तम रीतीनें बजावीत आहेत, याबद्दल वाद नाहीं. परंतु अशा संस्था अगदीं थोड्या असून त्यांचा उपयोग फक्त त्या त्या संस्थेच्या सभा-सदांना व वर्गणीदारानांच होतो. म्हणून सदर बाबतची योजना म्यु० पुढें आम्ही मांडणार आहों. व त्यांत अशा तऱ्हेच्या म्युनिसिपल वाचनालयाकरितां नोकर वर्ग नेमणेंबद्दल सुचविणार आहों. कारण अशा तऱ्हेचीं वाचनालयें मुंबई म्यु० चे देखरेखीखालीं शहराचे निरनिराळे भागांत सुरू आहेत.

आतां ज्या ज्या संस्थांना ग्रँट देण्यांत आली आहे तीं पुढें चालू ठेवणेकरितां आमचे मतें पुन्हां गुदस्त सालप्रमाणें याठिकाणीं "सदर संस्थांचे हिशेब व इतर कामें योग्य रीतीनें चालू असलेबद्दल कोणातरी लायक , परीक्षा पास झालेल्या अशा हिशेब तपासनिसाचा" दाखला असावा ही गोष्ट नमूद करणें इष्ट वाटतें.

आम्हीं आमचे गेले सालचे रिपोर्टांत विशेषेंकरून म्यु. टेक्निकल स्कुलकरितां जागेची अडचण असलेमुळें शाळेचे सोयीकरितां निराळे जागेची सोय करावी म्हणून नमूद केलें होतें व त्या-प्रमाणें मे. ज. क. चे ठ. नं० २८७ ता. २०–१२–२७ व ३६७ ता. २७–३–२८ असे दोन ठराव सदर शाळेजवळील घ० नं० ६२४ व ६२५ शुक्रवार पेठ हीं दोन्हीं घरें घेण्यांत यावीं म्हणून झाले. परंतु सदर ठरावाप्रमाणें कांहींच तजवीज करण्यांत आली नाहीं याबद्दल दिलगिरी

वाटते. सदर कामाकरितां लागणारी रक्कम या सालचे अंदाजपत्रकांत घातलेली नसून पुरवणी अंदा-जपत्रकांत तरी सदर रक्कम घालावी म्हणून प्रयत्न करण्यांत आला. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढील वर्षांचे अंदाजपत्रकाचे वेळीं या गोष्टीचा जरूर विचार होईल अशी आशा आहे. शाळेला पुरेशी जागा नसलेमुळें शाळेची सुधारणा होण्यास अडचण आहे.

आम्हांस आमचे सहकारी बंधूंनीं, विशेषतः रा० पोपटलाल शहा व रा० रंगोबा लडकत यांनीं, केलेल्या मदतीबद्दल आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक आभारी आहों.

सरते शेवटीं, टेक्निकल स्कूलचे सुपरिंटेंडंट श्री० रा० त्रिं० साठे यांच्या समाधानकारक व उत्साहयुक्त कामाबद्दल संतोष व्यक्त केल्याखेरीज मला हा रिपोर्ट संपवितां येत नाहीं.

ग. का. देशपांडे,

चेअरमन,

स्कूल्स कमिटी, पुणें शहर म्युनिसिपालिटी.

## परिशिष्ट १.

### टेकनिकल स्कूलच्या जमेचा तक्ता.

| अनुक्रम नंबर | बाबी | १९२८–२९ मधील ऐन जमा | १९२९–३० मधील ऐन जमा | जास्ती | कमी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेक्निकल स्कूलची फी ... | ३१—१२—० | ८—०—० | ... | २३—१२—० | |
| २ | टेक्निकल शाळेकरितां सरकारी ग्रँट .... | १,९९४—०—० | २२४६—०—० | २५२—०—० | .... | |
| ३ | आर्ट ड्रॉइंग परीक्षेवरील किरकोळ ग्रँट .... | १८६—०—० | १९१—०—० | ५—०—० | ... | |
| ४ | नवीन यंत्र सामुग्रीकरितां ग्रँट ... | ... | .... | ... | ... | |
| ५ | गोडबोले बक्षीस रकमे वरील व्याज .... | ६०—०—० | ६०—०—० | .... | .... | |
| ६ | किरकोळ ... | १,११२—२—० | ८८—३—० | ... | २३—१५—० | |
| ७ | म्युनिसिपल खजिन्यांतून जमा ... | ८,१४५—१२—६ | ८,९८४—०—० | ८३८—३—६ | .... | |
| | एकुण रुपये.... | १०,५२९—१०—६ | ११,५७७—३—० | १,०९५—३—६ | ४७—११—० | |

१ आगस्ट १९३०

रा. त्रिं. साठे,
सुपरिंटेंडंट,
व्हि. ज्यु. म्यु. टेकनिकल स्कूल, पुणें शहर.

## परिशिष्ट २.

### स्कूल कमिटीच्या खर्चाचा तक्ता.

| अनुक्रम नंबर | बाबी | | १९२८–२९ मधील ऐन खर्च | १९२९–३० मधील प्रत्यक्ष खर्च | वाढ | कमी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेक्निकल स्कूल नोकर-वर्ग | .... | ६,२१५–१३–० | ६,९२६—५–० | ७१०—८–० | ... |
| २ | कचेरी–खर्च | ... | २,०२१–१०–८ | २,१२०—०–० | ९८—५–४ | .... |
| ३ | नवीन यंत्रें | .... | १,९३६–१३–२ | २,१७०–१४–० | २३४–०–१० | .... |
| ४ | ऑईल एंजिन व यंत्रदुरुस्ती | ... | २९५—५–८ | ३००—०–० | ४–१०–४ | .... |
| ५ | गोडबोले प्राईझ फंडांतून बक्षिसें दिलीं | .... | ६०—०–० | ६०—०–० | .... | .... |
| | | | १०,५२०–१०–६ | ११,५७७—३–० | १०४७—८–६ | ... |
| ६ | डोनेशन फंडाच्या व्याजांतून बक्षिसें दिलीं:— | | | | | |
| | रा. नारायण गोविंद आपटे | १७–८–० | | | | |
| | ड्युक ऑफ आल्बनी | २४–८–० | | | | |
| | | ४२–०–० | ४२—०–० | २४—८–० | ... | १७—८–० |
| ७ | विशिष्ट संस्था व वाचनालयें यांना ग्रँट-इन्-एड | | | | | |
| | (ए) वेदशास्त्रोत्तेजक सभा | ... | २००—०–० | २००—०–० | ... | .... |
| | (बी) संस्कृत पाठशाळा | ... | १००—०–० | १००—०–० | ... | ... |
| | (सी) वेदपाठशाळा | ... | २००—०–० | २००—०–० | ... | .... |
| | (डी) गायन समाज | .... | २००—०–० | २००—०–० | ... | ... |
| | (इ) बहिरे व मुके यांची शाळा | .... | ५००—०–० | ५००—०–० | .... | ... |
| | (एफ्) राष्ट्रीय संस्थांना मदत | .... | १,०००—०–० | १,०००—०–० | ... | .... |
| | (जी) नगर वाचन-मंदिर | .... | ५००—०–० | ५००—०–० | .... | ... |
| | (एच्) मोफत वाचनालयें | .... | २,०००—०–० | २,०००—०–० | ... | ... |
| | (आय्) मराठी ग्रंथालय | .... | ५००—०–० | ५००—०–० | ... | ... |
| | (जे) शाहू छत्रपती मोफत वाचनालय | .... | ५००—०–० | ५००—०–० | ... | .... |
| | (के) डिप्रेस्ड क्लास मिशन लायब्ररी | .... | ५००—०–० | ५००—०–० | ... | .... |
| | (एल्) सावता माळी फ्री बोर्डिंग आणि लायब्ररी | .... | ... | ८००—०–० | ८००—०–० | ... |
| | (एम्) बॉय स्काऊट्स असोसिएशन | .... | .... | २५०—०–० | २५०—०–० | ... |
| | (एन्) गणेश पेठ मुसलमानांची लायब्ररी | ... | ३००—०–० | ३००—०–० | .... | ... |
| | (ओ) रविवार पेठ मुसलमानांची लायब्ररी | ... | ३००—०–० | ३००—०–० | ... | ... |
| | एकूण | ... | ६,८४२—०–० | ७,८७४—८–० | १,०५०—०–० | १७—८–० |
| | एकंदर एकूण | ... | १७,३७१–१०–६ | १९,४५१–११–० | २,०९७—८–६ | १७—८–० |

ता. १ ऑगस्ट १९३०

रा. त्रिं. साठे,
सुपरिंटेंडंट,
व्हि० ज्यु० ग्यु० टेक्निकल स्कूल, पुणें शहर.